मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोशी कचरा डेपो दुर्घटना : इमारतीत अडकलेल्या 7 जणांचा मृत्यू

## एकाचा अद्यापही शोध सुरू, दुर्घटनेतील मृतांची संख्या आठवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपो येथे झालेल्या दुर्घटनेमध्ये आज चौथ्या दिवशी शोधमोहीमेदरम्यान इमारतीत आढळलेल्या ७ जणांचा मृत्यू झाला आहे. तर एका व्यक्तीचा अद्यापही शोध सुरू आहे. या दुर्घटनेमध्ये आतापर्यंत झालेल्या मृतांची संख्या ८ वर पोहोचली आहे.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास कचऱ्याचा ढीग 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळून गंभीर दुर्घटना घडली. या इमारतीत २२ तर इमारतीशेजारी असलेल्या कचऱ्याच्या ढिगाखाली १ असे एकूण २३ नागरिक अडकले होते. पैकी इमारतीतून पाच नागरिक सुखरुप बाहेर पडले. उर्वरित अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी भारतीय सेना, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पीएमआरडीए अग्निशमन दल, पोलीस प्रशासन यांनी बचावकार्य सुरू केले. यामध्ये इमारतीत अडकलेल्या ९ नागरिकांना त्याच दिवशी सुखरुप बाहेर काढण्यात बचावपथकाला यश आले. तर उर्वरित व्यक्तींचा शोध घेण्यासाठी सर्च ऑपरेशन सुरू करण्यात आले.

यादरम्यान ९ जुलै रोजी भावेश वाणी या नागरिकास इमारतीतून बाहेर काढण्यात आले. त्यांना रुग्णालयात हलविले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. दरम्यान, दुर्घटनाग्रस्त इमारतीत प्रवेश करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू होते मात्र प्रवेश करण्याचा सुरक्षित मार्ग तयार करण्यासाठी अनेक अडचणी आल्या, त्यामुळे या इमारतीच्या सभोवतालचा मलबा हटवण्यासाठी १२ पोकलेन, डंपर, जेसीबी मशीनचा वापर करून मलबा हटविण्याचे काम हाती घेण्यात आले. परंतु दुर्घटनाग्रस्त इमारत धोकादायक व अस्थिर असल्याने इमारतीत प्रवेश करण्याचा मार्ग तयार करण्यास अडचणी आल्या.

काल रात्री दुर्घटनाग्रस्त इमारतीचा धोकादायक काँक्रिट भाग हटविण्यासाठी दोन अत्याधुनिक डिमोलीशन एक्सकॅव्हेटर मशिन घटनास्थळी आणण्यात आल्या. एनडीआरएफच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली या मशिनच्या सहाय्याने इमारतीचा अस्थिर भाग नियंत्रित पद्धतीने हटविण्यात आला. त्यानंतर इमारतीत प्रवेश करून इमारतीत अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यात आले. त्यामध्ये दिवसभर सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान अक्षय सावंत (वय ३५, मोशी), सुनील कोरके (वय ४०, आळंदी), सन्नी माने (वय ३९, गंधर्वनगरी, मोशी), महेश कुंभार (वय ३३, छत्रपती संभाजीनगर), नागेश गायकवाड (वय २६, संजय गांधी नगर, मोशी), रणजीत पाटील (वय २२, मोशी) तसेच राहुल गायकवाड (वय ३५, मोशी) हे इमारतीमध्ये आढळून आले. त्यानंतर सर्वांना तातडीने पिंपरी येथील वायसीएम रुग्णालयात पाठविण्यात आले असता त्यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी तपासणीअखेर मृत असल्याचे सांगितले. त्यामुळे या दुर्घटनेत आतापर्यंत मृत्यू पावलेल्या नागरिकांची संख्या ८ इतकी झाली आहे.

तथापि, इमारतीशेजारी असलेल्या कचऱ्याच्या ढिगाखाली अडकलेल्या एका नागरिकाचा अद्यापही युद्धपातळीवर शोध सुरू आहे. याकरिता एनडीआरएफच्या श्वान पथकाची मदत घेण्यात येत असून विविध यंत्रणांचा वापर करून अविरतपणे ही शोधमोहीम सुरू राहणार आहे.

# प्रकल्पावरील त्या इमारतीला परवानगी दिली कशी? पिंपरी-चिंचवड महापालिकेचा कारभार चव्हाट्यावर...

## कचऱ्याच्या डोंगराशेजारी तीन मजली इमारतीला 2019 मध्येच मंजुरी; तात्पुरत्या बांधकामाऐवजी कायमस्वरूपी इमारतीला परवानगी कशी, असा सवाल

**पुणे | प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पासाठी उभारलेल्या इमारतीवर शेजारीच असलेला कचऱ्याचा डोंगर कोसळला. या दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड महापालिका आणि बांधकाम परवानगी विभागाच्या कारभारावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महापालिकेने २०१९ मध्येच ही बांधकाम परवानगी दिल्याचे समोर आले आहे. मात्र, कचरा डेपोमध्ये तात्पुरते बांधकाम करण्याऐवजी थेट तीन मजली इमारत बांधाण्यासाठी परवानगी कशी देण्यात आली, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.





महापालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोमध्ये अँटोनी लॉरा कंपनीने सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर वेस्ट-टू-एनर्जी हा महत्त्वकांक्षी प्रकल्प सुरू केला होता. या प्रकल्पातून वीजनिर्मिती करून ती महापालिकेला पुरविण्याची व्यवस्था होती. मात्र, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत यापूर्वीही विविध शंका आणि आक्षेप घेण्यात आले होते.

आता इमारत दुर्घटनेमुळे हा प्रकल्प पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. कंपनीने महापालिकेकडून बांधकामाचा आराखडा मंजूर करून घेतल्यानंतर ही इमारत उभारली. मात्र, ज्या ठिकाणी वर्षानुवर्षे साठलेला कचऱ्याचा प्रचंड मोठा साठा आहे. त्याठिकाणी तात्पुरते कार्यालय किंवा शेड उभारून व्यवस्था करणे अपेक्षित होते. त्या ठिकाणी थेट तीन मजली इमारत उभारण्यासाठी कशी परवानगी देण्यात आली, हा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केली मोशी दुर्घटनास्थळाची पाहणी

## बचावकार्याचा घेतला आढावा; बाधितांच्या नातेवाईकांशी साधला संवाद, प्रशासनाला दिल्या आवश्यक सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज घटनास्थळी भेट देऊन सुरू असलेल्या शोध व बचावकार्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून बचावकार्याचा सविस्तर आढावा घेतला तसेच दुर्घटनेत बाधित झालेल्या नागरिकांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला आणि प्रशासनामार्फत सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही दिली.





यावेळी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार सुनील शेळके, माजी आमदार विलास लांडे, महापौर रवी लांडगे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, नगरसेवक विठ्ठल (नाना) काटे, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम व तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, "मोशी येथे घडलेली दुर्घटना अत्यंत वेदनादायी आणि संवेदनशील आहे. या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांच्या दुःखात शासन सहभागी आहे. राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असतानाही या दुर्घटनेच्या पहिल्या दिवसापासून मी संपूर्ण परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून होते. तातडीने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) घटनास्थळी दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि इतर माध्यमांद्वारे मी सातत्याने प्रशासनाच्या संपर्कात राहून बचावकार्याचा आढावा घेत होते."

त्या पुढे म्हणाल्या, "कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून बाहेर पडणारा विषारी वायू, सततचा पाऊस आणि ढिगाऱ्याची गुंतागुंतीची रचना यामुळे बचावकार्यात काही अडथळे निर्माण झाले. मात्र, अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि प्रशिक्षित पथकांच्या मदतीने शोध व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. दुर्घटनास्थळावरून बाहेर काढण्यात येणारे मृतदेह त्यांच्या नातेवाईकांना सन्मानपूर्वक दाखवावेत, अशा स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत."

दुर्घटनेच्या कारणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, "या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात येईल. चौकशी अहवालानुसार जे कोणी जबाबदार आढळतील त्यांच्यावर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल. तसेच बाधित कुटुंबांना तातडीचा दिलासा मिळावा यासाठी संबंधित कंपनी, महाराष्ट्र शासन आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका या तिन्ही स्तरांवरून आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात आहे."

नातेवाईकांशी झालेल्या संवादाचा उल्लेख करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, "मी स्वतः बाधितांच्या नातेवाईकांशी चर्चा करून त्यांच्या भावना, अडचणी आणि मागण्या जाणून घेतल्या आहेत. लवकरच राज्य शासन, महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित कंपनी यांच्या संयुक्त बैठकीत त्यांच्या सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून त्यांना न्याय मिळेल, यासाठी आवश्यक त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यात येईल."

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेप्रकरणी दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा; कंत्राटी पद्धत बंद करून कामगारांना कायम करा : कामगारनेते यशवंतभाऊ भोसले

## मृतांच्या वारसांना महापालिकेत कायम नोकरी, एसआयटी चौकशी आणि कंत्राटी पद्धत बंद करण्याची राष्ट्रीय श्रमिक आघाडीची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांना राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, या दुर्घटनेस जबाबदार असलेल्या प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून मृतांच्या नातेवाईकांना महानगरपालिकेत कायमस्वरूपी नोकरी देण्याची मागणी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी पिंपरी येथे (दि.११) आज पत्रकार परिषदेत केली.

यावेळी कामगारनेते यशवंतभाऊ भोसले म्हणाले की, महापालिका नागरिकांकडून कोट्यवधी रुपयांचा कर वसूल करते; मात्र कचरा संकलन, स्वच्छता, पाणीपुरवठा यांसारखी कायमस्वरूपी स्वरूपाची कामे कंत्राटी पद्धतीने करून मोठा भ्रष्टाचार केला जात आहे. काही ठेकेदार, दलाल आणि राजकीय हितसंबंध जपण्यासाठी ही व्यवस्था सुरू ठेवण्यात आली असून ती बेकायदेशीर आहे.कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबून कामगारांचा मृत्यू होण्याची घटना अत्यंत भीषण आणि दुर्दैवी असून, ही आशिया खंडातील श्रीमंत महापालिकेच्या प्रशासनाचे 'नाक कापणारी' घटना आहे.दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या कामगारांना जिवंतपणी सुरक्षितता, आवश्यक सुरक्षा साहित्य, गणवेश, वैद्यकीय सुविधा किंवा नियमित आरोग्य तपासणी देण्यात आली नाही. अनेक वर्षे कचऱ्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गंभीर आजार होतात, तरीही त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याची टीका त्यांनी केली.



दुर्घटना घडल्यानंतर आपत्कालीन परिस्थितीत राबवण्यात येणारे 'डिझास्टर मॅनेजमेंट' (आपत्ती व्यवस्थापन) प्रशासनाकडे असणे गरजेचे आहे, परंतु येथे फक्त 'सेटिंग मॅनेजमेंट' सुरू आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेलेली इमारत ही बेकायदेशीर होती आणि एका मजल्याची परवानगी असताना तेथे दोन मजली इमारत उभारून प्रशासनाचेच कर्मचारी व कंत्राटी कामगार काम करत होते,हे प्रशासनाचे मोठे अपयश आहे.कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेला आधुनिक प्रकल्प अनेक महिन्यांपासून बंद आहे. त्या प्रकल्पातील अत्याधुनिक यंत्रसामग्री काही महिन्यांत कचऱ्याचे डोंगर संपविण्याची क्षमता ठेवत असतानाही तांत्रिक कर्मचारी नियुक्त न केल्यामुळे आणि योग्य नियोजनाच्या अभावामुळे प्रकल्प बंद पडला आहे. त्यामुळे या दुर्घटनेला कारखाना बंद ठेवणारे अधिकारीही तितकेच जबाबदार आहेत.दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे स्वागतार्ह असले, तरी त्याने जीव परत येणार नाही. त्यामुळे प्रत्येक मृत कामगाराच्या वारसाला तातडीने महापालिकेत कायमस्वरूपी नोकरी द्यावी.या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी एस.आय.टी. (SIT) नेमावी.

कंत्राटी पद्धत पूर्णपणे बंद करून सर्व कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, त्यांना कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन, ईएसआय, आरोग्य सुविधा आणि वार्षिक वैद्यकीय तपासणी देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

प्रशासनाने केवळ पंचनामे आणि पाहणी करण्याऐवजी उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करावी. कामगारांच्या जीवाशी खेळणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि संबंधित ठेकेदारांना जबाबदार धरल्याशिवाय अशा दुर्घटना थांबणार नाहीत.राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या सुमारे साडेतीन हजार सभासद कर्मचाऱ्यांच्या वतीने "समान काम, समान वेतन" आणि सेवेत कायम करण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याची माहिती देत, पुढील १५ दिवसांत आयुक्तांनी संघटनेशी बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर हजारो कामगारांसह कचरा वाहने घेऊन महापालिकेवर तीव्र आंदोलन करण्यात येईल,असा इशाराही त्यांनी दिला.

# पालिकेच्या हलगर्जीने घेतला निष्पापांचा बळी; कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दाबला गेला काळजाचा तुकडा!

## पोलिसांच्याही डोळ्यांत पाणी तरळले; सुनेत्रा पवारांनी पाठ फिरवल्याने संतप्त नागरिकांची दगडफेक







**पुणे | प्रतिनिधी**

घटनास्थळावरून, ग्राउंड रिपोर्ट

गेल्या चार दिवसांपासून डोळ्यांतील अश्रू सुकले आहेत, घशाची कोरड तशीच आहे... 'माझा माणूस जिवंत असेल का?' या एकाच आशेवर, उपाशीपोटी आणि तहान विसरून कचरा डेपोच्या ढिगाऱ्याबाहेर ठिय्या मांडून बसलेल्या नातेवाईकांच्या संयमाचा आज अखेर कडेलोट झाला. पालिकेच्या ढिसाळ आणि बेजबाबदार कारभारामुळे कचऱ्याचा संपूर्ण डोंगर इमारतीवर कोसळला आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले. हलगर्जीपणाच्या या ढिगाऱ्याखाली अनेक निष्पाप जीव गाडले गेले आणि त्याचसोबत शेकडो संसार उद्ध्वस्त झाले. आज याच भीषण वास्तवाचा सामना करताना दुर्घटनाग्रस्तांच्या नातेवाईकांचा आक्रोश छाती फाडणारा होता.

**वहिनी आल्या, पण... नेत्यांच्या असंवेदनशीलतेने भडकला वणवा**

या संपूर्ण भीषण परिस्थितीची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार (वहिनी) आज घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. त्यांनी आत जाऊन दुर्घटनेची पाहणी केली खरी; मात्र बाहेर तासनतास डोळ्यांत प्राण आणून, काहीतरी दिलासा मिळेल या आशेने उभ्या असलेल्या पीडित नागरिकांशी एक शब्दही न बोलता, त्या थेट गाडीत बसून निघून गेल्या. नेत्यांच्या आणि प्रशासनाच्या या अत्यंत असंवेदनशील आणि उदासीन भूमिकेमुळे आधीच दुःखाच्या आगातील होरपळणाऱ्या नागरिकांच्या रागाचा स्फोट झाला. "आमची हक्काची माणसं मरतायत आणि यांना बोलायला वेळ नाही?" असा सवाल करत संतप्त नागरिकांनी थेट गाड्यांवर दगडफेक सुरू केली.

**पोलिसांच्याही डोळ्यांत पाणी; तो आक्रोश जीवघेणा होता!**

नागरिकांचा रोष इतका तीव्र होता की कायदा आणि सुव्यवस्था राखताना पोलिसांनाही नातेवाईकांचा हा आक्रोश आवरणे कठीण झाले होते. कर्तव्यावर असलेल्या पोलिसांसोबत संतप्त नागरिकांची मोठी हुज्जत झाली. मात्र, जेव्हा एका आईने, एका भावाने, आईने बहिणीने एका बापाने आपल्या मुलासाठी फोडलेला हंबरडा समोर आला, तेव्हा दगडफेक रोखण्यासाठी उभे असलेल्या खाकी वर्दीतील पोलिसांचेही हात थरथरले आणि त्यांच्याही डोळ्यांत पाणी तरळले. तो आक्रोश इतका जीवघेणा होता की, संपूर्ण परिसर सुन्न झाला होता.

**कार्यकर्त्यांची मध्यस्थी, अखेर रुग्णवाहिकेला वाट**

"आमच्या माणसांचे मृतदेह आम्ही घेऊन जाऊ देणार नाही, जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत इथून हलणार नाही," अशी भूमिका घेत नातेवाईकांनी मृतदेह नेणारी रुग्णवाहिका (अँम्ब्युलन्स) अडवून धरत होते. शेवटी घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही स्थानिक कार्यकर्त्यांनी पुढे होऊन नागरिकांची समजूत काढली, त्यांच्या पाठीवर हात ठेवला आणि धीर दिला. कार्यकर्त्यांनी विनंती केल्यानंतर, अत्यंत जड अंतःकरणाने आणि हुंदके देत नागरिकांनी रुग्णवाहिकेला जाण्यासाठी वाट मोकळी करून दिली.

**'हा अपघात नाही, पालिकेने केलेला खूनच!'**

"महापालिकेच्या अधिकाऱ्यांना वारंवार सांगूनही या कचऱ्याच्या डोंगराकडे दुर्लक्ष करण्यात आले. हा अपघात नाही, तर पालिकेच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे झालेला निष्पापांचा खून आहे," असा थेट आणि गंभीर आरोप हतबल झालेल्या नातेवाईकांनी केला आहे. कचऱ्याच्या साम्राज्याने आज अनेकांचे आयुष्य कायमचे संपवले आहे. या निष्पाप जीवांच्या मृत्यूला कारणीभूत असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई होणार का? की गरिबांच्या जीवाचे मोल प्रशासनाच्या लेखी शून्यच राहणार? हाच आक्रमक प्रश्न आज या ढिगाऱ्यासमोर उभा आहे.

# मोशी दुर्घटनेत अडकलेल्या 8 जणांचा मृत्यू; एकाचा शोध सुरु

## घरातील व्यक्ती सुखरूप बाहेर येईल, ही आस अजूनही मिटलेली नव्हती, त्या आशेवर 9 जणांचे कुटुंबीय आपल्या माणसाची वाट बघत होते



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्रात बुधवारी (दि. ८ जुलै) दुपारी दीड वाजताच्या सुमारास भीषण दुर्घटना घडली. 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर हजारो टन कचऱ्याचा डोंगर अचानक कोसळल्याने दुमजली इमारत क्षणार्धात कोसळली. इमारतीला हजारो टन कचऱ्याच्या मलब्याचा विळखा पडला. या दुर्घटनेत इमारतीमध्ये २३ कर्मचारी अडकल्याची माहिती समोर आली होती. त्यापैकी पाच जण स्वतः बाहेर पडले, तर बचाव पथकांनी एक महिलेसह सहा जणांना सुखरूप बाहेर काढले. उर्वरित ९ जणांना काढण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत होते. अखेर ३ दिवसांनंतर त्यापैकी ८ जणांचे मृतदेह प्रशासनाच्या हाती आले आहेत. तर अजून एकाचा शोध सुरु असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

मोशी येथील कचरा डेपोत ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांची चिंता आणि त्यांच्या कुटुंबांचा जीवघेणा संघर्ष वेदनादायी आणि अंगावर काटा आणणारा होत चालला होता. अथांग पसरलेल्या कचऱ्याच्या डोंगराकडे डोळे लावून बसलेल्या नातेवाइकांच्या डोळ्यांतील अश्रू आता सुकले होते. पण घरातील व्यक्ती सुखरूप बाहेर येईल, ही आस अजूनही मिटलेली नव्हती. त्या आशेवर ९ जणांचे कुटुंबीय आपल्या माणसाची वाट बघत होते. अखेर त्या नऊ जणांचे मृतदेहच या कुटुंबियांच्या हाती आले. त्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तब्बल ८० तासांच्या प्रयत्नानंतर प्रशासनाने या बचाव मोहिमेतून ८ जणांचे मृतदेह बाहेर काढले. तर एकाचा अजूनही शोध सुरु असल्याचे सांगण्यात आले आहे.

### महापालिकेकडून नियमांची पायमल्ली अन् हलगर्जीपणा

» वेस्ट एनर्जी प्रकल्पाचे कार्यालय आणि कचऱ्याचा ढीग यात किती अंतर होतं? सुरक्षा भिंत होती का? असेल तर कचऱ्याच्या ढिगाऱ्याची उंची पाहता सुरक्षा भिंत किती फूट उंचीची होती? कार्यालय आणि कॅन्टीन इतर सुरक्षित जागेवर उभारता आलं असतं का? दुर्घटनेनंतर इमारतीत किती कामगार अडकले, या आकडेवारीचा घोळ? मुख्य अभियंता संजय कुलकर्णींनी 16 कामगार, पालिका आयुक्त विजय सुर्यवंशींनी 20 कामगार अन मग मंत्री गिरीश महाजनांनी 23 कामगार अडकल्याची माहिती दिली. स्वतःच्या वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या एका इमारतीत किती जण असतील? हे पालिकेला माहीत नसणे, ही बाब गंभीर आहे. त्यामुळं मूळ आकडा लपवण्याचा हेतू तर नाही ना? अशी शंका उपस्थित केली जातीये.

# दोषी कोण? शिक्षा कोणाला? कविता आल्हाट यांचा संतप्त सवाल

## "तीन दिवसांपूर्वीच धोक्याची पूर्वसूचना होती; तरीही प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली नाही"

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपो येथील दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर असून, त्याला सर्वस्वी महापालिका प्रशासनाचा ढिसाळ व बेजबाबदार कारभार कारणीभूत असल्याचा थेट आणि संतप्त आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट यांनी केला आहे



पिंपरी-चिंचवड शहरातील संपूर्ण कचरा गेल्या सुमारे ३५ वर्षांपासून मोशी कचरा डेपोमध्ये साठवला जात असून, या ठिकाणी कचऱ्याचे अजस्त्र डोंगर उभे राहिले आहेत. या कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी महापालिकेने वेस्ट टू एनर्जी, हॉटेल वेस्ट टू सीएनजी, प्लास्टिकपासून इंधन व कच्चा माल निर्मिती, ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती तसेच बांधकाम व पाडकामातील कचऱ्यापासून वाळू, खडी आणि पेव्हिंग ब्लॉक्स तयार करण्यासारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारल्याचा दावा केला होता. मात्र, या प्रकल्पांमधील तांत्रिक त्रुटी, चुकीचे व्यवस्थापन आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अखेर हा अनर्थ ओढवला. वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा डोंगर कोसळून कर्मचाऱ्यांचा नाहक बळी गेल्याने संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची भावना निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकल्पातील तांत्रिक त्रुटींवर बोट ठेवत कविता आल्हाट यांनी प्रशासनाला धारेवर धरले. कचऱ्याचा डोंगर कमी करण्यासाठी महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून बायोमायनिंग प्रकल्प सुरू केले. मात्र, शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे दररोज हजारो टन कचरा नव्याने डेपोमध्ये जमा होत राहिला. बायोमायनिंगचे काम वेळेत पूर्ण न होणे, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण न करता ढिगारे उभारणे, कचऱ्याचा डोंगर आणि इमारतीमध्ये अवघे ३० मीटर अंतर ठेवणे तसेच इमारतीच्या दुप्पट उंचीचे कचऱ्याचे ढीग उभे करणे या गंभीर तांत्रिक चुका ठरल्या. याच निष्काळजीपणामुळे अखेर कचऱ्याचा डोंगर खचून निष्पाप कर्मचाऱ्यांचा बळी गेला, असे त्यांनी म्हटले.

कविता आल्हाट यांनी सांगितले की, त्या २०२२ पासून या गंभीर प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करत होत्या. तत्कालीन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तसेच अनेक वेळा लेखी निवेदने देऊन त्यांनी येथील वाढत्या धोक्याबाबत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. वेळेत ठोस उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी वारंवार केली होती.

याहूनही धक्कादायक बाब म्हणजे, ही भीषण दुर्घटना घडण्याच्या अवघ्या तीन दिवसांपूर्वीच कचऱ्याचा ढिगारा खचत असल्याची स्पष्ट माहिती स्थानिक स्तरावरून प्रशासनाला देण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने केवळ काही प्रमाणात कचरा हटवून वरवरची मलमपट्टी केली आणि गंभीर धोक्याकडे दुर्लक्ष केले, असा आरोपही त्यांनी केला.

"तीन दिवसांपूर्वी मिळालेल्या पूर्वसूचनेनंतर प्रशासनाने युद्धपातळीवर उपाययोजना केल्या असत्या, तर इतकी मोठी जीवितहानी निश्चितच टाळता आली असती. कोट्यवधी रुपये खर्च करूनही नागरिकांचे आणि कर्मचाऱ्यांचे जीव जात असतील, तर या निष्काळजी कारभाराला जबाबदार कोण? दोषी कोण? आणि शिक्षा कोणाला?" असा संतप्त सवाल कविता आल्हाट यांनी उपस्थित केला असून, या प्रकरणातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचा घरकुल परिसराला फटका

## नागरिकांसह शेतकऱ्यांचे मोठे नुकसान, आंदोलनाचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

येथील सेक्टर क्रमांक १७ मधील जॉगर्स पार्क परिसरात असलेल्या महानगरपालिकेच्या सांडपाणी जलशुद्धीकरण प्रकल्पातून (एसटीपी) मैलायुक्त व अशुद्ध पाण्याचा विसर्ग होत असल्यामुळे लगतच्या घरकुल परिसराला याचा मोठा फटका बसला आहे.



एसटीपी प्रकल्पाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्याने या भागातील घरांमध्ये १०-१० फुटांपर्यंत पाणी साचत असून नागरिकांचे नुकसान होत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून केला जा त आहे.

या पार्श्वभूमीवर नुकतीच पालिका अधिकाऱ्यांची एक बैठक पार पडली, ज्यात प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा तीव्र निषेध करण्यात आला. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी येत्या आठ दिवसांत आयुक्तांसोबत विशेष बैठक घेऊन, स्पाईन रोडवरून नवीन पाईपलाईन टाकून हे पाणी घरकुल परिसराबाहेरून वळवण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. दरम्यान, गेल्या १० वर्षांपासून घरकुलवासीयांसह स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतीचेही यामुळे मोठे नुकसान होत असून, त्यांना तात्काळ भरपाई न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

> **गेल्या १० वर्षांपासून घरकुल प्रकल्पाच्या बाजूला असणाऱ्या घरांचे व शेतीचे एसटीपी प्लांटच्या ओव्हरफ्लो पाण्यामुळे नुकसान होत आहे, शेतकऱ्यांचेही नुकसान होत आहे. प्रशासनाला आता आम्ही आणखी वेळ देणार नाही. घरकुलवासीय आणि शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, अन्यथा आम्हाला पुढील पाऊल उचलावे लागेल.**
>
> **- कुंदन गायकवाड, नगरसेवक**

> **प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे दरवर्षी घरकुलमधील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना या समस्येचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. माझी नुकतीच फ.प्रभागातील अधिकाऱ्यांसह बैठक झाली असून आयुक्तांसोबत ८ दिवसांत बैठक ठरवून स्पाईन रोडने नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम तातडीने मंजूर करून घेतले जाईल. तसेच, ज्या नागरिकांचे नुकसान झाले भरून द्यावे, अशी आमची ठाम मागणी आहे.**
>
> **- निलेश नेवाळे, नगरसेवक**

> **यापूर्वी सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क आणि जुन्या नकाशांच्या आधारे परिसराचे सर्वेक्षण व अभ्यास करण्यात आला आहे. पावसाचे प्रमाण जास्त झाल्यास सध्याच्या यंत्रणेवर अतिरिक्त भार पडतो. त्यामुळे आता वरच्या भागातील पाणी थेट घरकुलमध्ये येऊ न देता, ते स्पाइन रोडवरून पुढे वाहून नेण्याचे नियोजन आहे. अमृत योजनेअंतर्गत पाईपलाईनची कामे पूर्ण झाली असली, तरी अतिवृष्टीच्या काळात पाण्याचा निचरा योग्य गतीने होण्यासाठी हा नवीन ओपन नाला अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, यामुळे भविष्यात घरकुल परिसरातील पाणी साचण्याची समस्या पूर्णपणे सुटेल.**
>
> **- अजय सूर्यवंशी, सह शहर अभियंता**